REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १९ मार्च १९४७ | अंक १२

दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली. )*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | ५,०६,५०० |
| भरलेलें | रु. | २,५३,००० |
| रिझर्व्ह | रु. | ४,०५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु.१,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग,
लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतीलः—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, ( २ ) गुजरी–कोल्हापूर, ( ३ ) जयसिंगपूर, ( ४ ) इचलकरंजी, ( ५ ) पेठ–वडगांव, ( ६ ) मलकापूर, ( ७ ) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरीलः—( ८ ) मुंबई, ( ९ ) निपाणी ( जि. बेळगांव )


★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. ए. सावंत, जं. मॅनेजर



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

( हे प्रॉस्पेक्टस् नसून जाहिरात आहे. प्रॉस्पेक्टसची मूळ कॉपी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् मुंबई यांचेकडे ता. ७–२–४७ ला नोंदली गेली आहे. )

# दि फ्लॅश लाइट पेंट्स् लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस, १७१, बुधवार, पुणें २

**अधिकृत भांडवल रु. दहा लाख ( १०,००,००० )**

फक्त रु. ५० च्या २०,००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागिलेलें.

**विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,००० ( पांच लाख )**

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर,
चेअरमन, लँडलॉर्ड व ॲग्रिकल्चरिस्ट, बारामती.
डायरेक्टर—( १ ) किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी.
( २ ) ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी.
( ३ ) दि पुना इन्व्हेस्टर्स लि., पुणें २

२ श्री. रा. रा. एन्. के. रानडे,
५५, डेक्कन जिमखाना कॉलनी, पुणें ४.
डायरेक्टर—( १ ) रानडे इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि., पुणें.
( २ ) दि ट्रस्ट ऑफ इंडिया इन्शुअरन्स कं. लि. पुणें
( ३ ) दि न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि., मुंबई.

३ श्री. रा. रा. श्रीधर लक्ष्मण आपटे,
श्रीधाम, टिळकरोड, पुणें २.
मॅनेजिंग डायरेक्टर, दि लाँग लाइफ इन्श्युअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर.
डायरेक्टर (१) दि डेक्कन टोबॅको वर्क्स लिमिटेड, पुणें नं. ४.
(२) करमरकर, आपटे आणि कं. लि., पुणें ४
(३) दि ह्यूमन वेलफेअर सोसायटी लि. पुणें.

४ श्री. रा. रा. गणेश हरि करमरकर,
बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, ४३७ ब, नारायण पेठ, पुणें शहर.

५ श्री. रा. रा. एम्. एस. भालेराव,
बी. एजी., व्यापारी, बारामती.

६ श्री. रा. रा. टी. व्ही. कुलकर्णी,
बी. ए., एलएल. बी., वकील खोल गल्ली, धुळें ( पू. खानदेश ).

७ कॅप्टन वामन चिंतामण जोगळेकर,
१७१ बुधवार, पुणें २
डायरेक्टर—दि बझार पब्लिकेशन लिमिटेड, मुंबई; पार्टनर जोगळेकर अँड सन्स, शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स, पुणें.

८ श्री. रा. रा. वसंत एकनाथ नांदेडकर,
बी. एससी. ( टेक ) बनारस हिंदू युनिव्हर्सिटी. एक्स ऑफिशिओ डायरेक्टर.

९ श्री. रा. रा. माधव नारायण मोडक,
मेकॅनिकल अँड इलेक्ट्रिकल एंजिनिअर, ३२३, सदाशिव, पुणें शहर.
एक्स ऑफिशिओ डायरेक्टर.

## लीगल ॲडव्हायसर

श्री. जी. एच. करमरकर, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट
४३७ बी, नारायण, पुणें शहर.

## ऑडिटर्स

मे. जी. एम. ओक आणि कंपनी,
१८० बुधवार, पुणें २

## बोर्ड ऑफ ॲडव्हायसर्स

प्रिन्सिपॉल डॉक्टर एन. एन. गोडबोले, एम. ए., बी. एससी., पीएच. डी. ( बर्लिन )
प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ टेक्नॉलजी, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, बनारस ( यू. पी. )
डॉक्टर डी. आर. भवाळकर, एम. एससी., पीएच. डी. ( लंडन ) सागर युनिव्हर्सिटी, सागर ( सी. पी. )

## —बँकर्स—

( १ ) दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें व सर्व शाखा ( २ ) दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें व सर्व शाखा ( ३ ) दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड, मुंबई व सर्व शाखा ( ४ ) दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें व सर्व शाखा.

## —ब्रोकर्स—

( १ ) मेसर्स एस. ए. देशपांडे,
एम. ए., एलएल. बी.
मेंबर बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

( २ ) मेसर्स जोगळेकर अँड सन्स
शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स,
१७१, बुधवार, पुणें २.

## —मॅनेजिंग एजंट्स:—

मेसर्स मोडक नांदेडकर आणि कंपनी, १७१, बुधवार, पुणें शहर.

उद्देश—मे. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज मुंबई यांचेकडे नोंदलेल्या ह्या कंपनीच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशन व प्रॉस्पेक्टस्च्या अंतर्गत असलेल्या सर्व व्यवहाराकरितां ही कंपनी स्थापन झालेली आहे. त्यांत विशेषतः ऑइल पेंट्स्, एनॅमल पेंट्स्, डिस्टेंपर्स, वार्निशेस, बेकिंग एनॅमल्स, छपाईच्या शाई वगैरे करण्याचा कंपनीचा विचार आहे.

शेअर अर्ज कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस, ब्रोकर्स आणि बँकर्स यांचेकडे मिळतील.

# अर्थ

बुधवार, ता. १९ मार्च, १९४७



संस्थापक

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रा. वा. गो. काळे


## अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणांत क्रांती

### प्रे. ट्रूमन ह्यांचें महत्त्वाचें भाषण

ग्रीस आणि तुर्कस्तान ह्यांस आर्थिक मदत देण्याकरितां अमेरिकन काँग्रेसची मान्यता मागतांना प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं केलेल्या भाषणानें सर्वत्र खळबळ उडून गेली आहे. ग्रीस देशास आर्थिक सहाय तातडीनें हवें आहे, कारण त्या देशाचें युद्धामध्यें मनस्वी नुकसान झालेलें आहे, आणि त्या देशाच्या हाकेस ओ देणें अमेरिकन अध्यक्षांस अत्यावश्यक वाटत आहे. ग्रीसचा शेजारी तुर्कस्तान, ह्याचीहि सुधारणा होण्यासाठी त्यासहि बाहेरील मदतीची गरज आहे. ग्रेट ब्रिटनला त्याच्या स्वतःच्या आजच्या परिस्थितींत इतरांच्या मदतीस जातां येणें अशक्य झालें आहे, आणि अमेरिकेला त्या बाबत पुढाकार घेणें क्रमप्राप्त वाटत आहे.

ग्रीस आणि तुर्कस्तान ह्यांना द्यावयाच्या मदतीचें समर्थन करतांना प्रे. ट्रूमन हे वरील खुलासा करून थांबलेले नाहींत. युरोपांतील लहान देशांतून अल्पसंख्याक कम्युनिस्ट आपलें वर्चस्व वाढवूं पहात आहेत परंतु ही गोष्ट अमेरिकेनें तटस्थपणानें सहन करणें योग्य होणार नाहीं, असा प्रे. ट्रूमन ह्यांचा दावा आहे. प्रातिनिधिक सरकार, खुल्या निवडणुकी, व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, इत्यादि मार्गानें जीवनास वळण लावण्याची एक पद्धत असून दुसऱ्या पद्धतींत अल्पसंख्याकांनीं बहुसंख्याकांवर बळजबरीनें सत्ता चालविणें व कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य नसणें ह्या बाबी असतात. स्वातंत्र्यप्रिय लोकांचें, कुरघोडी करणाऱ्या अल्पसंख्यांकांपासून संरक्षण करून स्वातंत्र्याच्या जोपासनेस सहाय करणें हें अमेरिकेचें कर्तव्य आहे, असें प्रे. ट्रूमन ह्यांनीं जाहीर केलें आहे. ग्रीसमध्यें अल्पसंख्याकांनीं सत्ता बळकावली तर त्याचा तुर्कस्तानावर प्रतिकूल परिणाम होऊन तो वणवा "मध्य-पूर्व" कडील सर्व राष्ट्रांना व्यापून टाकल्याविना रहाणार नाहीं, त्यासाठी अमेरिकेनें तात्काळ कडक उपाययोजना केली पाहिजे, असें प्रे. ट्रूमन ह्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. "ही उपाययोजना करण्यास फक्त अमेरिकाच समर्थ आहे." ३० जून १९४८ अखेरपर्यंत ग्रीस व तुर्कस्तान ह्यांना सुमारें १५० कोटि रुपयांची मदत अमेरिकेनें द्यावी, त्या मदतीच्या देखरेखीसाठी लष्करी व बिनलष्करी अंमलदार धाडण्यांत यावेत, इतकेंच नव्हे तर निवडक ग्रीक व तुर्की लोकांच्या जय्यत शिक्षणाचीहि व्यवस्था करण्यांत यावी अशी प्रे. ट्रूमन ह्यांची मागणी आहे.

प्रे. ट्रूमन ह्यांनीं आपल्या भाषणांत रशियाचा स्पष्ट उल्लेख केला नसला, तरी तें रशियाला बोचक वाटल्याविना रहाणार नाहीं. जागतिक राजकारणांत रशियाचें वर्चस्व असावें, कां अमेरिकेनें तें बळकवावें, हा मूलग्राही प्रश्न प्रस्तुत भाषणानें उपस्थित केला आहे. अमेरिकेचें आजवरचें परराष्ट्रीय धोरण प्रे. ट्रूमन ह्यांच्या भाषणानें जुनें पुराणें ठरलें आहे आणि भूमध्य समुद्राभोंवतालच्या प्रदेशांत अमेरिका आतां प्रभावशाली होऊं पहात आहे. युरोपांतील कम्युनिझमचा प्रसार थांबविण्याची जबाबदारी, अखिल जगांतील स्वातंत्र्यप्रिय लोकांच्या हिताच्या दृष्टीनें अमेरिकेनें पत्करली आहे आणि त्या देशाचें जागतिक नेतृत्व लक्षांत घेतां, असें करणें क्रमप्राप्तच आहे, असा प्रे. ट्रूमन ह्यांनीं सूर काढला आहे. प्रे. ट्रूमन ह्यांच्या भाषणाची पार्श्वभूमि लक्षांत घेतली म्हणजे दीडशें कोटींच्या ह्या तात्कालिक मदतीमुळें इतिहासास अत्यंत परिणामकारक वळण आतां लागणार हें स्पष्ट दिसून येतें. १८२३ चें "मनरो धोरण" आतांपर्यंत अमेरिकन परराष्ट्रीय धोरणांस आधारभूत असे; प्रे. ट्रूमन ह्यांच्या भाषणानें अमेरिकेस जागतिक राजकीय आखाड्यांत उघडपणें उभें केलें आहे.

ग्रेट ब्रिटनला रशियाशीं सलोख्याचे संबंध ठेवावयास हवे आहेत, परंतु अमेरिकेची मैत्री त्यास अत्यंत जिव्हाळ्याची आहे. अशा परिस्थितींत, भांडवलशाहीस विरोध करणारें ब्रिटिश मजूर सरकार अमेरिका व रशिया ह्यांच्यामधील संभाव्य तेढीचे प्रसंगीं आपली भूमिका कशी सांभाळूं शकेल, हें लवकरच दिसून येईल.

### राव कमिटीचा रिपोर्ट

सर बी. एन. राव ह्यांच्या अध्यक्षतेखालील, हिंदु लॉ कमिटीनें आपला रिपोर्ट सरकारास सदर केला आहे. हिंदु स्त्रियांना मालमत्तेची व्यवस्था पहातां येणार नाहीं व त्यांना त्यांचे पुरुष नातेवाईक फसवतील, हा युक्तिवाद कमिटीस मान्य नाहीं. हिंदु स्त्रियांना सध्या मालमत्तेवर पूर्ण अधिकार नाहीं, तो देण्यांत यावा असें कमिटीनें सुचविलें आहे. बापानंतर मुलास मिळावयाच्या हिश्याच्या निम्मा हिस्सा मुलीस मिळावा; आईच्या मृत्यूनंतर तिच्या मालमत्तेपैकी मुलीस मुलाच्या दुप्पट हिस्सा मिळावा; मिताक्षराऐवजी दायभाग पद्धतीनें वारसा ठरवावा, वगैरे शिफारसी राव कमिटीनें केल्या आहेत. हिंदु कायदा हा इतर कायद्याप्रमाणें कलमवार रचलेला नाहीं, तो तसा रचण्यांत यावा आणि मूळ कायद्यांत थोडी सुधारणा करण्यांत यावी, असें तरुण पिढीस वाटते. त्यास अनुसरून राव कमिटीनें आपल्या सूचना केल्या आहेत. एकपत्नीकत्वास कायद्याचें स्वरूप देण्याविषयीं कमिटीची शिफारस आहे.

**अमेरिकन कर्जावर इंग्लंड किती काळ जगणार?**—ग्रेट ब्रिटननें अमेरिकन कर्जाचा आणखी ५ कोटि पौंडांचा हप्ता उचलला आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें अन्नपुरवठा चालू ठेवण्यासाठी व अमेरिकन तंबाखू वगैरे आयात करण्यासाठी अमेरिकन कर्जाचा उपयोग केला जात आहे; यंत्रसामुग्रीसारख्या धनोत्पादक आयातीकडे नाहीं; त्यामुळें हें असेंच किती दिवस चालणार, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

**मोटारींची आयात**—मार्च १९४६ ते सप्टेंबर १९४६ ह्या सहा महिन्यांत हिंदुस्थानामध्यें ३,७७१ मोटारींची आयात झाली. त्यापैकीं २,६८८ ब्रिटिश बनावटीच्या होत्या; २८५ अमेरिकेंतून आल्या व ७९८ कॅनडानें धाडल्या.

# स्फुट विचार

## वस्तूंच्या किंमतींचें स्थैर्य

हिंदुस्थानांत सध्या चालू असलेल्या महागाईमुळें गरीब आणि मध्यम वर्ग यांचें दैनंदिन जीवन फारच कष्टप्रद झालेलें आहे. बहुसंख्य जनतेच्या दृष्टीनें या महागाईला आळा घालणें जरूर असून त्यासाठी मध्यवर्ती सरकारनें वस्तूंच्या किंमतींना स्थैर्य आणण्यासाठी एक बोर्डहि नेमलें आहे. सदर बोर्डाकडे शेतीच्या मालाच्या व पक्क्या मालाच्या किंमतींत संबद्धता उत्पन्न करण्याचें काम सोंपविण्यांत आलेलें आहे, असा खुलासा मध्यवर्ती सरकारचे फडणीस मि. लिआकत अलीखान यांनीं नुकताच मध्यवर्ती विधिमंडळांत केला. बहुतेक देशांतील किंमतींच्या पातळीसंबंधीं असा अनुभव आहे कीं पक्क्या मालाच्या किंमती शेतीच्या मालाच्या मानानें तितक्या पडत नाहींत. मंदीच्या काळांत शेतीच्या मालाच्या किंमती पक्क्या मालाच्या किंमतीपेक्षा अधिक प्रमाणांत खालीं जातात. तेजीच्या काळांतहि शेतीच्या मालाच्या किंमती पक्क्या मालाइतक्या चढत नाहींत. हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत या दोन प्रकारच्या मालाच्या किंमतींत फार मोठी तफावत असणें अत्यंत अनिष्ट आहे. मध्यवर्ती असेंब्लींतील या विषयावरील चर्चेंत प्रो. रंगा यांनीं शेतकऱ्यांची बाजू मांडली हें इष्टच झालें. प्रो. रंगा हे स्वतः अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्यास बोर्डाला केव्हांही आनंदच वाटेल असें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलें आहे. त्यामुळें शेतकऱ्यांची बाजू बोर्डापुढें मांडली जाईल याविषयीं आतां शंका घेण्याचें कारण उरलें नाहीं. मि. लिआकत अलीखान यांनीं आपल्या भाषणांत दोन महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट केले आहेत. सध्या जरूरीच्या वस्तूंवर जीं नियंत्रणें आहेत तीं काढलीं तर गरीब लोकांना त्यांच्या गरजाहि भागवितां देणार नाहींत. तेव्हां तूर्त तरी नियंत्रण चालू ठेवणेंच इष्ट असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें, अधिक उत्पादनाच्या गरजेवर भर देतानांच त्याची वाटणीहि अधिक न्याय्य तऱ्हेनें झाली पाहिजे हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें. उत्पादन व वाटणी योग्य तऱ्हेनें होण्यास नियंत्रणाबरोबरच किंमतींची स्थिरताहि आवश्यक आहे यांत शंका नाहीं.

## ग्रामोद्योगांचें संवर्धन

मुंबई प्रांतांतील ग्रामोद्योगांचें संवर्धन करण्यासाठी काय करतां येईल यासंबंधीं शिफारसी करण्याकरितां मुंबई सरकारनें एक कमिटी मध्यवर्ती विधिमंडळाचे सभासद श्री. मनु सुभेदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमली होती. खेड्यांतील जनतेला पिकाचा व जमीन कसण्याचा हंगाम संपल्यावर उद्योग नसतो. त्यामुळें खेडेगांवांतील मनुष्यबळाचा अनिश्चित बेकारीमुळें कांहींच उपयोग होत नाहीं. त्या दृष्टीनें ग्रामोद्योगांची स्थापना, संरक्षण आणि संवर्धन करणें अत्यंत इष्ट ठरणार आहे. कमिटीनें केलेल्या शिफारशींत सरकारी चालकत्वाखाली ग्रामोद्योग केंद्रें कांहीं निवडक खेड्यांतून स्थापण्यांत यावीं ही सूचना महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणें या केंद्रांतून उत्पन्न झालेल्या मालाची वहातूक, कच्च्या मालाची खरेदी, हिशेब, कुशल कामगारांचा पुरवठा, इत्यादि बाबीहि सरकारनेंच आपल्या देखरेखीखाली ठेवावयाच्या आहेत. केंद्रांची उभारणी करतांना कच्च्या मालाची सुलभता, वहातुकीची सोय इत्यादी बाबीकडे लक्ष पुरण्याचीही सूचना करण्यांत आलेली आहे. हातमागावर कापड विणणारा कामगार आणि त्या कापडाची विक्री करणारा यांच्या दरम्यान कोणीही दलाल असूं नये ही कमिटीची सूचना उत्पादक, कामगार आणि ग्राहक यांच्या दृष्टीनें महत्वाची आहे. यासाठी खेडेगांवांतील हातमाग–कापडाच्या विक्रीची जबाबदारीही सरकारनेंच घ्यावी असें सुचविलेले आहे. केंद्रांतील माल शहराकडे अगर इतर ठिकाणीं निर्यात करावयाचा झाल्यास अधिक किंमत ठेवण्याची शिफारस करण्यांत आलेली आहे. त्याच प्रमाणें एखाद्या खेडेगांवच्या केंद्रांत नवीन कारखाना काढण्यासाठी प्रथम सरकारी परवानगी घेण्याची अट सुचविण्यांत आली आहे. ग्रामोद्योग केंद्रासाठी प्रांतिक व जिल्हाबोर्ड स्थापन करण्याची सूचना केलेली असून त्यांच्यातर्फे ग्रामोद्योगांची संघटणा करावयाची आहे. अहवालाचें क्षेत्र विस्तृत असून त्यांत स्थानिक गरजेप्रमाणें फेरफाराची सोय ठेवली आहे.

## वनस्पति तूप डोळ्यास अपायकारक आहे काय?

वनस्पति तुपाचे हिंदुस्थानांत २३ कारखाने आहेत व त्यांत १,९०,००० टन वनस्पति तूप तयार होतें. लवकरच हें उत्पादन ४,९०,००० टनांवर जाईल. खऱ्या तुपाचें भेसळ तूप करण्याकडे ह्यापैकी पुष्कळ वनस्पति तुपाचा उपयोग केला जातो. वनस्पति तुपासंबंधीं शास्त्रज्ञांच्या मतांत वैचित्र्य आढळून येतें. इझतनगर येथील रिसर्च इन्स्टिट्यूटला हिंदुस्थान सरकारचे अन्न मंत्रि डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनीं वनस्पतीवर प्रयोग करण्यास सांगितलें, तेव्हां हें तूप दृष्टीस अपायकारक असल्याचें आढळून आलें. उंदरांवरील प्रयोगांत, त्यांची तिसरी पिढी आंधळी निपजतें, असे दिसून आलें. मनुष्यप्राण्यावर त्याचा काय परिणाम होतो, हें स्पष्ट झालें, म्हणजे वनस्पति तुपाच्या प्रसारास पायबंद घालण्याची योजना करतां येईल. वनस्पति हें तेल म्हणून विकण्यांत यावें, तूप म्हणून नव्हें; जेथें तूप विक्रीस ठेवण्यांत येतें, तेथेंच वनस्पति विक्रीसाठी ठेवण्यांत येऊं नये आणि उत्पादनानंतर त्यांत ५% बेसिक तेलाचें मिश्रण करण्यांत यावें, अशी व्यवस्था सरकार करीत आहे.

## वनस्पति तूप म्हणजे महाग केलेलें तेल

हाफकिन इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर, सर साहेबसिंग सोखे, ह्यांनीं वनस्पति तुपावर आपले विचार व्यक्त करतांना तेलऐवजी त्याचें वनस्पति तूप करून वापरण्यांत कांहींच फायदा नाहीं; किंमत मात्र जास्त पडते, असें मत व्यक्त केलें आहे. हिंदुस्थानांत वनस्पति तुपाचा स्वैंपाकांत उपयोग केला जातो. तेव्हां, तेलांतून हैड्रोजन वायु फिरवून तें घट्ट करावयाचें व तें पुनः वितळवून स्वैंपाकांत वापरावयाचें, ह्यामुळें तेंच तेल महाग करून घेण्यापलीकडे कांहीं उपयोग होत नाहीं, असें त्यांचें स्पष्ट म्हणणें आहे. वनस्पति तुपांत असलेला व्हिटॅमिनचा अंशहि त्यामुळें नष्ट होतो. हिंदुस्थानांत स्वस्तपणास प्राधान्य आहे. तेव्हां, वनस्पति तुपापेक्षां स्वच्छ तेलच लोकांना उपलब्ध करून दिलें, तर फार उत्तम होईल. युरोपमध्यें थंडीमुळें वनस्पति तूप पचण्यास हलकें असतें; तशी परिस्थिति हिंदुस्थानांत नाहीं. वनस्पति तुपाचा वितळण्याचा बिंदु ११२° फॅ. वरून ९८.६° फॅ. वर आणावा, असा हिंदुस्थान सरकारनें हुकूम काढलेला असला तरी तो किती कारखाने पाळतात ह्याची शंकाच आहे. वनस्पति तुपाचे नवे नवे कारखाने निघत आहेत, त्यांना इतर कारखान्यापेक्षां प्राधान्य कां मिळत आहे ह्याविषयीं सर साहेबसिंगांनीं आश्चर्य व्यक्त केलें आहे.

## पडत्या पाण्याच्या शक्तीचें विजेंत रूपांतर

### वेगवेगळ्या प्रांतांतील योजनांचा परामर्श

(४)

**द. हैद्राबाद**

दक्षिण हैद्राबाद संस्थानांतून दोन मोठ्या नद्या व त्यांच्या कित्येक उपनद्या वाहतात. गोदावरी व कृष्णा ह्या त्या नद्या होत. त्यावर शेतीच्या व विजेच्या दृष्टीनें केंद्रें उभारण्याच्या योजना केलेल्या आहेत. गोदावरीवर शोण पुलाजवळ ३ केंद्रें उभारून ६५ हजार किलोवॅट वीज उत्पन्न होईल. तुंगभद्रा नदी संस्थानाच्या सरहद्दीवरून वहाते. त्यामुळें तिच्या पाण्यावर मद्रास प्रांत व म्हैसूर संस्थान यांचीहि सत्ता आहे. या नदीवर बांध घालून ५०,००० किलोवॅटचें केंद्र उभारण्यासाठी पायाची कोनशिलाहि बसविण्यांत आली आहे. हैद्राबाद हद्दींत शिरतांच कृष्णा नदी ३ मैलांत १३० फुटांचा व १० मैलांत २५० फुटांचा उतार उतरते. या ठिकाणीं ३० हजार किलोवॅट उत्पादनाचें केंद्र उभारतां येऊं शकेल व ६ लक्ष एकर जमिनीस पाणीपुरवठा होईल. कृष्णेला भिमा व तुंगभद्रा या नद्या मिळाल्यावर ती दोन टेकड्यांमधून वहाते. त्या ठिकाणीं धरण बांधून ३५ मैल लांबीचें तळें तयार करतां येईल. त्याचेपासून ९ लक्ष एकर जमीन भिजविली जाईल व ५० हजार किलोवॅट वीजशक्ति निर्माण होऊं शकेल. त्यानंतरची देवनूर योजना गोदावरीची उपनदी मंजिरा हिजवरील धरणाची होय. हें धरण बिदरजवळ बांधलें जाईल व त्यावर १८ हजार किलोवॅट वीज उत्पादन होऊन त्याशिवाय निजामसागर तलावास पाणीपुरवठा होऊन त्याची वीजउत्पादनाची शक्ति वाढेल. हैद्राबाद शहराजवळचा निजामसागर तलाव १५ वर्षांपूर्वी मंजिरा नदीला दोन मैल लांबीचा बंधारा बांधून तयार करण्यांत आलेला आहे. त्याचा उपयोग आतांपर्यंत शेतीसाठी होत होता. आतां त्यावर वीजउत्पादक संच बसविण्यांत येणार आहेत. त्यामुळें हैद्राबाद शहरास वीजपुरवठा होईल. सध्यां तेथें वाफेवरील वीजकेंद्र आहे.


**म्हैसूर**

पूर्व गोलार्धांत म्हैसूर संस्थान हें जलशक्तिजन्य विजेचें आद्य प्रवर्तक होय. १९०२ सालीं कावेरी नदीला म्हैसूर पासून ३६ मैलांवरील शिवसमुद्रम् येथील धबधब्यावर संच बसवून वीज उत्पन्न करण्यांत आली व तेथून ९२ मैलांवर असलेल्या कोलार येथील सोन्याच्या खाणींना पुरविली जाऊं लागली. १९३८ सालीं या केंद्रांची मूळची ६ हजार अश्वशक्ति ३५ हजारांवर नेण्यांत आली. त्यासाठी म्हैसूर जवळ कृष्णराजसागर नांवाचा तलाव बांधण्यांत आला. सध्यांच्या वीजकेंद्राची शक्ति ६० हजार अश्वशक्ति किंवा ४५ हजार किलोवॅट आहे. त्यापासून बंगलोर, कोलार खाणी व म्हैसूर–भद्रावती यांना वीजपुरवठा होतो. परंतु औद्योगिक प्रगतीच्या वाढत्या मागणीमुळें गिरसप्पा धबधब्यावर नवें वीजकेंद्र बांधण्यांत येणार आहे. त्यास जोग फॉल्स प्रॉजेक्ट असें नांव आहे. यासाठी नवी यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. ही नवी वीजशक्ति म्हैसूर व भद्रावतीकडे पाठविण्यांत येईल.

(संपूर्ण)

लग्नसमारंभास व मेजवानीसाठी
—रुपॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
:: सुधारस ::
वापरा
बाटली किंमत २-८-०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज,
९५२, सदाशिव, लक्ष्मी रोड, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




पुणें चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें






## व्यापारविषयक बातम्या

**ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर**—हें व्यापारी व औद्योगिक प्रदर्शन लंडन व बर्मिंगहॅम येथें ता. ५ मे रोजीं सुरू होईल व १६ मे पर्यंत उघडें राहील. सुमारें ३,००० स्टॉल्स त्यांत आढळतील. ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशांतून येणाऱ्या जिनसांचें स्थान घेऊं शकतील अशा ब्रिटिश बनावटीच्या जिनसांस उत्तेजन देण्याचे हेतूनें हें प्रदर्शन १९१५ सालीं प्रथम भरविण्यांत आलें. युद्धकाळांत तें भरवितां आलें नाहीं तरी १९४२ सालापासूनच त्याच्या पुनरुद्धाराची पूर्वतयारी चालू करण्यांत आली. आतां आठ वर्षांच्या खंडानंतर तें पुनः भरत आहे. प्रदर्शनांत ब्रिटिश साम्राज्यांत तयार होणारा मालच फक्त मांडला जाईल. प्रत्यक्ष उत्पादकांनाच त्यांत माल ठेवतां येईल, व्यापाऱ्यांना नाहीं. बर्मिंगहॅम येथें इंजिनिअरिंग विभाग मांडण्यांत येईल व लंडन येथील विभागांत इतर कारखानदारीस वाव मिळेल. जगांतील १,००,००० व्यापाऱ्यांना प्रदर्शन पहाण्यास येण्याविषयीं आमंत्रणें गेलीं आहेत आणि त्याबरोबर उत्तरासाठी तिकीट लावलेलें पोस्टकार्डहि धाडण्यांत आलें आहे.

**दोन मोठ्या कंपन्या एकत्रित झाल्या**—जॉन फाउलर अँड कं. ( लीडस ) लि. आणि मार्शल, सन्स अँड कं. लि. ( गेन्सबरो ) ह्या दोन सुप्रसिद्ध एन्जिनिअरिंग कंपन्यांचें एकत्रीकरण होत आहे. डिझेल ट्रॅक्टरचें उत्पादन करणाऱ्या ह्या दोन कंपन्यांखेरीज दुसरी मोठी कंपनी ब्रिटिश साम्राज्यांत नाहीं. दोन्ही कंपन्या १०० वर्षें चालू आहेत. त्या एकत्र झाल्यानें उत्पादन वाढून तें काटकसरीनेंहि होऊं शकेल.

**फ्रेंच फुलांची निर्गत**—ग्रेट ब्रिटनमध्यें फ्रान्समधून दररोज दोन ते तीन टन वजनाच्या फुलांची आयात होते. ह्या फुलांच्या वाहतुकीसाठी खास सोईचे रेल्वे डबे बनविण्यांत आले आहेत. फ्रान्समधील बागांतील फुलें तोडल्यापासून तीन दिवसांत तीं ब्रिटिश दुकानांत विकत मिळूं शकतात.

**निर्गतीसाठी उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न**—निर्गतीसाठी बनविण्यांत येणाऱ्या ब्रिटिश मालाचे उत्पादनांत युद्ध कालांत २,५०,००० ब्रिटिश कामगार गुंतलेले होते. १९३९ सालीं तो आकडा ९,९०,००० होता. आतां तो १४,५०,००० झाला असला तरी निर्गतीच्या आवश्यकतेच्या मानानें तो अपुराच पडत आहे.

**अदृश्य निर्गतीस प्रोत्साहन**—"मालाचे निर्गतीवर सध्या पुष्कळ भर दिला जात आहे, हें योग्यच आहे. परंतु बँकिंग, विमा, वहातुक, इत्यादि 'अदृश्य' निर्गतीच्या बाबींकडे त्यामुळें दुर्लक्ष्य होतां कामा नये. युद्धापूर्वी ह्या बाबींमुळें ग्रेट ब्रिटनला मोठ्या प्रमाणावर परदेशी हुंडणावळ उपलब्ध होऊं शके. आपल्या मालाला गिऱ्हाईक मिळविण्याइतकेंच बँकिंग वगैरेला गिऱ्हाईक मिळविणें जरूर आहे. निर्गत व्यापाराच्या त्या पोषक बाबी आहेत. त्यांना यंत्रसामुग्री लागत नाहीं किंवा त्या कच्चा माल खायला मागत नाहींत, ह्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणें ज्यास्तच इष्ट आहे. ":—बार्कलेज बँकेचे चेअरमन, मि. एडविन फिशर, ह्यांचें भाषण.

**अमेरिकेला विमानानें टपाल**—हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेला ८ आण्यांत विमानानें पत्रें पाठविण्याची सोय ता. १ मार्च १९४७ पासून केली आहे. सर्व पोस्ट ऑफिसांत ६ आणे किंमतीचे कोरे कागद ठेवले असून त्यावर २ आण्याचीं तिकिटें लावावीं लागतील.

**हिंदुस्थानसाठी अमेरिकन रेल्वे इंजिनें**—पेनसिल्व्हानिआंतील बाल्डविन रेल्वे एंजिनांच्या कारखान्याकडून १६ रेल्वे एंजिनें घेण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. युद्धसमाप्तीनंतर नोंदलेली ही सर्वांत मोठी मागणी आहे. दर एंजिनाला १५ लक्ष डॉलर्स किंमत पडणार आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

( शेड्यूल्ड बँक ) —:— हेड ऑफिस : पुणें शहर

( एकूण खेळतें भांडवल रु. २ कोटीचे वर )

बँकेतर्फे नवीन लोकोपयोगी व्यवस्था : एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीची स्थापना

—ट्रस्टी कंपनीचें भांडवल—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. १,२५,००० |

—:बँकेच्या शाखा:—

डेक्कन जिमखाना, पुणें, खडकी, मुंबई ( फोर्ट ), गिरगांव, जळगांव, नागपूर ( सिताबर्डी व इतवारी ), रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर ( पे-ऑफिस), सोलापूर, धुळें, चाळिसगांव, हुबळी, नाशिक, कल्याण.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बँकेच्या व ट्रस्टी कंपनीच्या कामासंबंधीं मॅनेजर यांस भेटावें.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,६०,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ९८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. ( ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

### भोर स्टेट बँक लि., भोर

( वार्षिक सभा: ३०-३-१९४७ )

वरील बँकेस तिच्या व्यवहारांत १९४६ सालीं १४,१२४ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडांत ३,००० रु., गेल्या दोन वर्षांकरितां ३% डिव्हिडंडसाठी दरबारकडून तात्पुरती घेतलेली रकम परत करणेस ५,००० रु., १९४६ च्या ४% डिव्हिडंडसाठी ५,००० रु. व नोकरवर्गास बोनस १,००० रु. अशी त्याची वाटणी सुचविण्यांत आली आहे. तात्पुरत्या वाढलेल्या ठेवींचा उपयोग बँकेनें कर्जरोखे खरेदींत केला, त्यांचे विक्रीच्या व्यवहारांत तिला ४८,२७३ रु. मिळाले ते सर्वच्या सर्वच इन्व्हेस्टमेंट रिझर्व्हमध्यें मिळवून बँकेनें आपला एकूण रिझर्व्ह फंड ५३,२७३ इतका मोठा केला आहे. तिसऱ्या वर्षाचे अखेरीसच एवढी गंगाजळी निर्माण करून, डायरेक्टर बोर्डानें बँकेच्या स्थैर्याचा व प्रगतीचा उत्कृष्ट पाया घालून दिला आहे. बँकेच्या इन्व्हेस्टमेंटसमध्येंहि सुमारें ९ हजारांचा वाढावा दिसत आहे. प्राथमिक खर्च वगैरे बाबी ताळेबंदांत नाहींत. दरबारनें भागीदारांना ३% डिव्हिडंडची पांच वर्षांची हमी दिली होती. बँकेनें पहिल्या दोन वर्षांच्या हमीचे ५,००० रु. दरबारास परत करून १९४६ सालाकरितां हमीपेक्षा १% ज्यास्त म्हणजे ४% डिव्हिडंड देण्याचे योजिलें आहे. ह्याचा अर्थ, दरबारच्या हमीचा आधार अनवश्यक वाटण्याजोगी बँकेस सुस्थिति निर्माण झाली आहे. नोकरवर्गासहि दोन महिन्यांचा निवळ पगार बोनस दिला जाणार आहे. अशा रीतीनें अल्पावधींत बँकेनें उत्कृष्ट प्रगति केली आहे. संस्थानचे दिवाण हे बँकेचे चेअरमन असतात. व्हाइस चेअरमन म्हणून श्री. वा. पुं. वर्दे ( प्रो. नाबर आणि कं. ) ह्यांनीं व मॅनेजर म्हणून श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं बँकेच्या स्थापनेपासून काम केलें आहे.

---

### भारत ई. बँक लि.

( वार्षिक सभा: २३-३-४७ )


वरील बँकेचें खेळतें भांडवल आतां सुमारें ५५½ कोटि रुपये झालें आहे. गेल्या वर्षी बँकेस ५२,०८३ रु. निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ४½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. यंदा रिझर्व्ह फंडांत १०,८८० रुपयांची भर पडणार असून ७ ००० रुपये कॉन्टिन्जन्सी फंडांत जाणार आहेत. बँकेचे दोघे मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांचेशीं बँकेचा असलेला करार कंपनी कायद्याच्या नव्या २७७ एच. एच. कलमाप्रमाणें ३० जून १९४९ रोजीं संपत आहे.

---

**को-ऑपरेटिव्ह बँकिंग न्यूज लेटर**—को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें वरील न्यूज लेटर सुरू केलें त्यास एक वर्ष पुरें होऊन त्याच्या दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक आतां प्रसिद्ध झाला आहे. सहकारी बँकांच्या हिशेबाचे त्रैमासिक तक्ते बॉंबे को. कार्टलीमध्यें प्रसिद्ध होण्याचें बंद झालें, ती उणीव भरून काढणें आणि सभासद-बँकांच्या हितास पोषक अशी माहिती देणें हा प्रस्तुत न्यूज लेटरचा उद्देश आहे. त्याप्रमाणें गेल्या वर्षाच्या अवधींत न्यूज लेटरनें चांगलें काम केलें आहे, आणि तें चालूं ठेवण्यांत येणार आहे.

**इंदूर संस्थानांतील सुधारणा योजना**— इंदूरच्या महाराजांनीं नेमलेल्या शेतकी समितीनें निरनिराळ्या योजना आखल्या असून त्यावर जवळ जवळ १ कोटी रुपये खर्च होणार आहेत. योजनांत, लष्करांतील शिपायांना धंदेवाईक शिक्षण, चांगल्या गुरांची निपज, चांगल्या बी-बियाणांचा पुरवठा इत्यादि बाबी प्रमुख आहेत.



पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.


फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा यावरचे नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादनशक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून सध्या बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

# बँकेकडून कर्ज कसें मिळवावें ?

( लेखकः—एक अनुभवी कर्जदार )

बँकेकडून कर्ज मागणारांच्या, बँकेसंबंधीं कित्येक चुकीच्या कल्पना व अपेक्षा असतात, परंतु त्याबाबत खरी परिस्थिति त्यांस माहीत झाल्यास पुष्कळ व्यवहार सोईचे होतील. दुकानें,कारखाने, यंत्रसामुग्री, इत्यादि विकत घेण्यासाठीं बँका कर्जें कधींच देत नाहींत; जिंदगी आधी अस्तित्वांत असेल तरच बँका कर्ज देतात. कर्जें देणें हा बँकांचा रोजचा धंदा आहे. कर्ज मागणारे लोक बँकांकडे धाव घेतात; बँका 'कर्ज कोणीं घेईल काय?' असें शोधीत जात नाहींत. त्यामुळें, बँका अनेक अर्जदारांतून त्यांना योग्य वाटेल त्या अर्जदारांची निवड करूं शकतात, आणि ज्या मनुष्याविषयीं गांवांत लोकमत चांगलें आहे अशासच कर्ज मिळूं शकतें.

## मॅनेजरचे प्रश्न

कर्ज मंजूर करणं ही गोष्ट बँकेच्या मॅनेजरच्या एकट्याच्या अधिकारांत नसते; डायरेक्टर बोर्ड किंवा त्याची कमिटि ह्यांचा तो अधिकार असतो. मॅनेजर फक्त शिफारस करूं शकतो. मॅनेजरशीं मुलाखत यशस्वी होणें अर्जदाराच्या दृष्टीनें केव्हांहि महत्त्वाचें असतें. मॅनेजर अर्जदारास साधारणतः खालील प्रश्न विचारतोः—

( १ ) गेल्या व त्याच्या मागील वर्षाचा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक आणलें आहे काय?

( २ ) त्यांस रजिस्टर्ड अकौंटंटनें मान्यता दिली आहे काय ?

( ३ ) आपला व्यवसाय किती काळ चालू आहे ?

( ४ ) गेल्या पांच वर्षांचे निवळ नफ्याचे आकडे सांगा.

( ५ ) तुम्हांस किती कर्ज पाहिजे, कशासाठी पाहिजे व तें परत केव्हां फेडणार ?

( ६ ) तुम्ही आणि तुमचे इतर डायरेक्टर कर्जास जामीन रहाण्यास तयार आहांत काय ?

( ७ ) तारण काय देऊं शकतां ?

वरील प्रश्नांपैकीं कशासाठी कर्ज पाहिजे, हा प्रश्न सर्वांत ज्यास्त महत्वाचा आहे. धंद्याच्या वाढीपेक्षा त्याची कार्यक्षमता वाढावी याकरितां कर्ज हवें असेल तर बँक तें सुलभतेनें देईल. मोठ्या जाहिराती देणें, मशिनरी वाढविणें, प्रचार करणें इत्यादींसाठी कर्ज देण्यास बँक फारशी खुष बहुधा असणार नाहीं. बाजाराचें वातावरण अनिश्चितपणाचें नसेल आणि पैसा मुबलक असून एकंदर चलती असेल तर मात्र बँक त्यासाठीहि कर्ज देईल. बँक साधारणपणें अल्प मुदतीचीं कर्जें पसंत करतात. अर्जदार कंपनीचें शेअरभांडवल, बँकेच्या दृष्टीनें महत्वाचें असतें. तें जितकें मोठें तितकें उत्तम. अर्जदाराच्या मालमत्तेवर बँकेचा बोजा नेहमीं पहिला असावा अशी तिची इच्छा असते. डिबेंचर्स काढलेलीं असतील तर बँकांना ती एक अडचण वाटते. तेव्हां कर्ज मागूं इच्छिणाऱ्या कंपन्यांनीं डिबेंचर्स काढून आपले हातपाय बांधून घेऊं नयेत. कंपन्यांच्या कागदपत्रांवर तिच्या डायरेक्टरांनीं वैयक्तिक जबाबदारी पत्करून सह्या कराव्या असा बँकांचा नेहमींचं आग्रह असतो.

## पुढील कार्यक्रमापेक्षा मागील पराक्रम महत्वाचा

अर्जदारानें आपला धंदा पूर्वी कसा चालविलेला आहे, ही गोष्ट महत्त्वाची असते. पुढें काय करणार, ह्यापेक्षा मागें काय केलें ह्यावर बँकेच्या मॅनेजरचें अनुकूल मत होणें जास्त अवलंबून असतें. बँकेकडून कर्ज मिळविण्याची तयारी आगाऊ अनेक वर्षें करावी लागते, असें जाणते धंदेवाले सांगतात, तें कांहीं खोटें नाहीं. बँकेचा जरूर तो विश्वास आगाऊच निर्माण केलेला असला म्हणजे कर्ज मागतांच तें मिळूं शकतें. एकाद्या कर्जाबाबत बँकेस वाईट अनुभव आला तर मॅनेजरला कारणमीमांसा करावी लागते. तेव्हां मॅनेजरच्या दृष्टीनें, चांगला समजला जाणारा धंदेवाला वाईट ठरून त्याचें कर्ज बुडणें, उपऱ्या कर्जदाराचें कर्ज बुडण्यापेक्षां बरें ठरतें. एकाद्याची बँकेंत दीर्घकाळ मोठी ठेव असेल, तर त्याची परिस्थिति बरी आहे असें बँक मॅनेजरला वाटतें. कबूल केल्याप्रमाणें गोष्टी केल्या तर विश्वास वाढण्यास उत्कृष्ट सहाय होतें. कितीहि किरकोळ बाब असली तरी वायदा चुकवूं नये.

## अनुकूल मत निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी

आपले रोखे, विमा पॉलिसी, वगैरे बँकेंत ठेवल्यास, तुम्ही पुढची काळजी वहात आहां हें मॅनेजरच्या लक्ष्यांत येईल. हप्त्यांची रकम बँकेमार्फत भरीत गेल्यास प्रत्येक वेळेस मॅनेजरला त्याची आठवण होईल. रोख्यांवरील व्याज व डिव्हिडंड ह्यांची वसुली बँकेमार्फत केली म्हणजेहि मॅनेजरच्या नजरेसमोर ही मालमत्ता राहील. शक्य तेव्हां बँकेस कांहीं काम मिळवून द्या, मित्रांना बँकेंत खातीं उघडण्यास सांगा, कर्जासाठी चांगले अर्जदार बँकेकडे घेऊन जा. ह्या सर्वांमुळें उत्पन्न होणारा अनुकूल परिणाम तुम्हांस उपकारकच ठरेल.

ह्या सर्व बाबी किरकोळ वाटत असल्या तरी त्यांचा एकत्रित परिणाम चांगला होऊन कालांतरानें तुम्ही कर्जासाठी मॅनेजरकडे जाल, तेव्हां तुमचें काम तात्काल होईल.

---

**प्रमुख ब्रिटिश बँकांचा नफा**

| | १९४६ पौंड लक्ष हजार | | १९४५ पौंड लक्ष हजार | | वाढ किंवा कमी % |
|---|---|---|---|---|---|
| लॉइड्स | १५ | ८३ | १६ | २९ | — २·९ |
| मिडलँड | १९ | ८७ | २० | ५६ | — ३·४ |
| वेस्टमिन्स्टर | १३ | ६६ | १४ | ०५ | — २·८ |
| नॅ. प्रॉव्हिन्शिअल | १३ | ३१ | १३ | ५६ | — १·९ |
| डिस्ट्रिक्ट | ४ | ८७ | ४ | ५० | +८·० |
| बार्कलेज् | १६ | ७६ | १७ | ४० | —३·७ |
| मार्टिन्स | ७ | ०८ | ६ | ४५ | ९·७ |

---

## कर्जनिवारण कायद्याखालील अर्ज

शेतकऱ्यांच्या कर्जनिवारण्याचा कायदा नासिक जिल्ह्यांत मे १९४५ मध्यें ४ तालुक्यांना ( पेठ, दिंडोरी, कळवण, सटाणा ) लागू करणेंत आला होता. परंतु आतां मात्र तो राहिलेल्या तालुक्यांना सुद्धां १ फेब्रुवारी १९४७ पासून लागू झाला आहे.

तरी कर्जदार शेतकरी बांधवांनीं ३१ जुलै १९४७ चे आंत संबंधी बोर्डाकडे ठराविक नमुन्यांत अर्ज करावेत.

| तालुका | लवाद बोर्डाचें ठिकाण |
|---|---|
| नासिक, इगतपुरी | नासिक |
| सिन्नर | सिन्नर |
| निफाड | पिंपळगांव बसवंत |
| येवला, चांदवड | येवला |
| मालेगांव, नांदगांव | मालेगांव |

सदर प्रचारकार्यासाठी प्रत्येक तालुक्याचे प्रमुख ठिकाणीं सभा घेणेंत येणार आहेत. याबाबत सूचना अगोदर कळतीलच. तरी ज्या त्या भागांतील कर्जदार शेतकरी बांधवांनीं ज्या ज्या वेळीं सभा होतील त्या त्या वेळीं हजर राहून माहिती घ्यावी, असें सुपरवायझर, पिंपळगांव भाग, जि. नासिक, श्री. एस. एन. ठोके, हे लिहितात.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

सासाहिक बंद भाव

व्याज-वजा
कोहिनूर रु. १३ दि. २५-३-४७
गोकाक रु. १२ दि. ७-४-४७

व्याज-वजा
अपोलो रु. ०-४-० दि. ३१-३-४७
बॉम्बे-डाइंग—बोनस शेअर

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १७।३।४७ |
|---|---|---|---|---|---|
| २१७०-८; २१२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २२५० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा-आर्डिनरी | ७५ | ४१५ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २९ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३८-४ |
| २२७७-८; २१३२-८ | 'बोनस शेअर' | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २२२० |
| ११६०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ७१२ |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६३५ |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३११ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०४ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०८ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३१० |
| ७४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-८ |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-१४ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | म | ,, डिफर्ड्स | १ | ३-४ |
| ११९९-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६३७-८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १८०-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३२ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८० |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१-० |

**पौंड नकोत, डॉलर द्या**—उधार-उसनवार पद्धती बंद झाल्यापासून ग्रेट ब्रिटन अमेरिकन कपाशीऐवजी ब्राझीलमधील कपास खरेदी करीत आहे. परंतु आतां बँक ऑफ ब्राझिलनें ब्रिटिश पौंडात रकमा स्वीकारण्याचें बंद केलें आहे. ब्राझीलची कपास न घेऊन लँकेशायरच्या गिरण्यांची गैरसोय करावयाची, कीं अगोदरच कमी पडत असलेले डॉलर बँक ऑफ ब्राझीलला देत रहावयाचें, असा प्रश्न ग्रेट ब्रिटन पुढें उभा आहे.

**उत्पादन वाढीसाठी सरकारचे प्रयत्न**—कापडाचें उत्पादन वाढावें ह्यासाठी हिंदुस्थान सरकार शक्य तेथें तीन पाळ्या सुरू करून कापडाच्या जाती कमी करणार आहे. येत्या पांच वर्षांत साखरेचे ४५ नवे कारखाने निघतील. कच्चा माल, यंत्रसामुग्री, इत्यादि मिळविण्यांत कागदाच्या गिरणीवाल्यांस सहाय केलें जात आहे. कागदाच्या जाती कमी केल्यानें त्यांचें उत्पादन वाढेल. सिमेंटच्या कारखान्यांत १९५२ पूर्वी बरीच वाढ झालेली दिसेल. कोळशाचा तुटवडा हेंच पोलादाच्या उत्पादनांतील घटीचें प्रमुख कारण आहे, तें दूर करण्याचा प्रयत्न चालू आहे. केरोसीन व पेट्रोल ह्यांच्या खाणींचा शोध सुरू आहे

**पेट्रोलची आयात व पुरवठा**—१९४७ च्या पहिल्या सहा महिन्यांत हिंदुस्थानामध्यें ७ कोटी,६१ लक्ष गॅलन पेट्रोल आयात होईल, अशी अपेक्षा आहे. १९४६ च्या पहिल्या सहामाहीत ५ कोटि, ९६ लक्ष गॅलन पेट्रोल आलें होतें, तर दुसऱ्या सहामाहींत फक्त ४ कोटि, ७४ लक्ष गॅलन पेट्रोलच येऊं शकलें. लष्करी मागणी कमी झाल्याकारणानें पेट्रोलचा तुटवडा तीव्रतेनें भासत नसला तरी एकूण मागणी पुरी पाडण्या इतका पुरवठा अद्याप होऊं शकत नाहीं. पेट्रोलचें रेशनिंग केव्हांपासून रद्द होऊं शकेल, हें इतक्यांत सांगता येत नाहीं.

**बँकांच्या शाखा व त्यांचेमधील स्पर्धा**—हैद्राबाद स्टेट बँकेच्या मुंबई शाखेचें उद्घाटन सर एच. पी. मोदी, ह्यांच्या हस्तें नुकतेंच झालें. बँकांच्या शाखांत भरमसाट वाढ व त्यामुळें निर्माण होणारी अनिष्ट स्पर्धा ह्यांपासून कोणाचाच फायदा होत नाहीं, असें ते आपल्या भाषणांत म्हणाले. नव्या शाखांनीं नवें काम मिळवावें; जुन्या शाखांशीं स्पर्धा करूं नये, असा त्यांनीं सल्ला दिला.

**आंतरराष्ट्रीय गहू परिषद**—लंडन येथें ता. १८ रोजीं सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय गहू परिषदेस हिंदुस्थानातर्फे भाग घेणाऱ्या शिष्टमंडळाचें नेतृत्व सर रॉबर्ट हर्चिंग्ज ह्यांचेकडे आहे.

**आष्टे अर्बन को. बँक लि.**—वरील नांवाची बँक आष्टे ( सातारा ) येथें नुकतीच स्थापन झाली असून तिची प्राथमिक सभा गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर होणार आहे. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आप्पाराव रुकडे हे आहेत


पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या

### सभासदास विनंति

पुणें. सें. को. बँकेची सहामाही चर्चात्मक साधारण सभा शुक्रवार तारीख २१ मार्च १९४७ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत ( बुधवार पेठ, लक्ष्मी रोड,पुणें शहर ) भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अवश्य यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून
द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें-प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.

## विविध माहिती

**सोन्याचांदीच्या आयातीला बंदी**—हिंदुस्थान सरकारनें सोन्याचांदीच्या आयातीला बंदी केल्याच्या वार्तेला रिझर्व्ह बँकेचे एक्सचेंज कंट्रोलर मि केळे यांनीं पुष्टी दिली आहे. या बाबतींत सरकारच्या धोरणाचा खुलासा करणारें पत्रक काढण्यांत येणार नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें.

**भाडें नियंत्रण कायद्याची मुदतवाढ**—मुंबई प्रांतांतील भाडें नियंत्रण कायद्याची मुदत मुंबई कायदे मंडळानें मार्च १९४८ अखेर पर्यंत वाढविली आहे. यासंबंधी अधिक व्यापक कायदा करण्याचा सरकारचा विचार असून दरम्यान भाडेकरूंना या कायद्याचें संरक्षण मिळणें आवश्यक, आहे असें कायदा मंत्री श्री. देसाई यांनीं सांगितलें.

**चांदीच्या किमतींत घट**—हिंदुस्थाननें सोन्या-चांदीच्या आयातीला बंदी केल्यामुळें अमेरिकेंत चांदीचा भाव दर औंसामागें अडीच सेंट घसरला.

**पोलंड-झेकोस्लोव्हाकिआ मैत्रीचा तह**—जर्मनी अगर त्या राष्ट्राशीं दोस्ती असणाऱ्या राष्ट्रांकडून आक्रमक हल्ला झाल्यास एकमेकांच्या संरक्षणास बांधून घेणारा २० वर्षें मुदतीचा करार पोलंड व झेकोस्लोव्हाकिआ यांच्या दरम्यान करण्यांत आला आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या नौकरवर्गांत कपात**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व साधारण सभेच्या गेल्या बैठकींत संस्थेच्या कारभारांत काटकसर करण्याचें ठरलें होतें. त्याला अनुसरून अमेरिकेच्या २०० नोकरांना कामावरून कमी करण्यांत येणार आहे. यासंबंधी संघटनेचे सरचिटणीस मि. ट्रिग्विलाय नौकरवर्गाच्या सभेमध्यें एक घोषणा करणार आहेत.

**अमेरिकेच्या विलासी नौका**—अमेरिकेच्या जहाज वाहतुक समितीला दोन नव्या विलासी बोटी बांधण्यासाठी कायद्याचा मसुदा तयार करण्याचें फर्माविण्यांत आलें आहे. क्वीन एलेझाबेद किंवा क्वीन मेरी यांच्यापेक्षा त्या लहान होणार असल्या तरी त्यांत सुखसोयींची रेलचेल करण्यांत येणार आहे.

**चांदीच्या चढत्या किंमतींना पायबंद**—हिंदुस्थान सरकारच्या फडणिसी खात्यांतील एका अधिकाऱ्यानें सोन्या-चांदीच्या आयातीच्या बंदीचें समर्थन केलें आहे. परराष्ट्रांचें चलन बेतानें वापरून धान्य व यांत्रिक सामुग्री यांच्या आयातीसाठी तें राखून ठेवणें जरूर आह असें त्याचें मत आहे. त्याचबरोबर, चांदीच्या किंमती भरमसाठ वाढूं नयेत म्हणून उपाय करण्याची जरूरीही या अधिकाऱ्यानें प्रतिपादली.

**वीज पुरवठ्याचें राष्ट्रीयीकरण**—ग्रेट ब्रिटनमधील सबंध वीज पुरवठा ब्रिटिश सरकार आपल्या हातीं घेत आहे. एकूण ५७० वीज कंपन्या त्यामुळे बंद होतील. नुकसानभरपाईदाखल त्यांना सुमारे ५०० कोटि रुपये मिळतील. भागीदारांना त्यांच्या शेअर्सच्या बाजारभावाइतकी किंमत दिली जाईल.

**खनिज संपत्तीचा शोध**—हिंदुस्थानच्या खनिज संपत्तीचें संशोधन करण्यासाठी हिंदुस्थान सरकार एका पंचवार्षिक कार्यक्रमाचा विचार करीत आहे. खनिज संपत्तीची गणना आणि कस यासंबंधीं पहाणी करण्याचें कार्यक्रमांत योजलेलें आहे.

**न्यूयॉर्कच्या कापुस बाजारांत संप**—न्यूयॉर्कमधील कॉटन एक्सचेंजच्या कामगारांनीं ३० टक्के पगारवाढीसाठी संप केल्यामुळें बाजार बंद पडला. न्यूयॉर्कमधील एक्सचेंज कामगारांच्या संपानें बंद पडल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.


# विजय टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.



# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

तुम्ही दूरदृष्टीनें नियमानें ठराविक रक्कम बचत केल्यास तुम्हाला अगर तुमच्या नातेवाईकांना दरमहा निर्वेध मदत मिळण्याची आकर्षक योजना.

कंपनीकडे माहितीपत्रकांसाठीं आजच लिहा अगर भेटा.

**हेड ऑफिस**

८६६ सदाशिव पेठ, पुणें २

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.

मॅनेजर

शाखा:—कराची, धुळें, नागपूर व हुबळी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
ए. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.